सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२६/1671

प्रति,

दिनांक : 30 JUN 2026

प्राचार्य,

सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र/बीबीए/बीसीए/एमबीए/एमसीए अभ्यासक्रमाच्या संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१५६९ दिनांक १९/६/२०२६.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/Intake Approval/२०२६/४७२ दिनांक ३०/६/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तूकला परिषद अशा शिखर परिषदांव्दारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असून पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना या शिखर परिषदांव्दारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापिठांची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक ३ जूलै २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करुन उपस्थित राहण्याबाबत आपणास निर्देश देण्यात आले आहे.

त्यानुषंगाने, आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापिठ सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन **दिनांक ९ जूलै २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर सादर करुन आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयात उपस्थित राहावे.** मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहिती कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील.

(डॉ. व्हि. आर. मानकर)

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती

**सहपत्र :-** संदर्भीय पत्र.

महाराष्ट्र शासन
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२६/ ६७०२ दिनांक : 30 JUN 2026

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ :- संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २ /एनजीसी/Intake Approval/२०२६/४२६,दि.१७.६.२०२६

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद अशा शिखर परिषदांद्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असुन पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांद्वारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापीठांची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि. ३ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये निर्देशित करण्यात आले होते. अद्यापही ब-याच संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापीठांची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि.१० जुलै २०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर सादर करावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.१३/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. अध्यक्ष / सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

४.कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.